May 24, 2025

| | |
|---|---|
| To,<br>**BSE Limited**,<br>25, P. J. Towers,<br>Dalal Street,<br>Mumbai – 400 001<br>**Ref:** Company Scrip Code: 532834 | To,<br>Listing Department,<br>**National Stock Exchange of India Ltd**.,<br>Exchange Plaza, Bandra Kurla Complex,<br>Bandra (East), Mumbai- 400051<br>**Ref:** Symbol: CAMLINFINE \|\| Series: EQ |

**Sub:** **Newspaper Advertisement-Disclosure under Regulation 47 of Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ('SEBI Listing Regulations')**

Dear Sir/Madam,

Please find enclosed the extract of Audited Financial Results (Consolidated and Standalone) for the quarter and year ended March 31, 2025 published in the Newspapers viz. - Financial Express (in English) and Loksatta (in Marathi).

Kindly take the above information on records.

Thanking you,
Yours faithfully,
**For Camlin Fine Sciences Limited**

Rahul Sawale
Digitally signed by Rahul Sawale
Date: 2025.05.24 13:41:33 +05'30'

**Rahul Sawale**
**Company Secretary**
**& VP Legal**

Encl.: a/a.

Registered Office:
Camlin Fine Sciences Limited, Floor 2 to 5, In G.S. Point, CST Road, Kalina, Santacruz (East), Mumbai 400 098.
CIN: L74100MH1993PLC075361

+91 22 6700 1000 +91 22 2832 4404 corporate@camlinfs.com www.camlinfs.com

# वादळग्रस्त विमानास पाककडून क्षेत्रबंदी

## श्रीनगरमध्ये सुरक्षित उतरले

**पीटीआय, नवी दिल्ली**

**प्रतिकूल हवामानाच्या** तडाख्यात सापडलेल्या भारतीय विमानाला आपल्या हद्दीत सुरक्षित प्रवेश करण्यास नकार देऊन पाकिस्तानचा अमानवी चेहरा पुन्हा जगासमोर आला. २२७ प्रवाशांना घेऊन दिल्लीहून श्रीनगरला निघालेल्या इंडिगो विमानाला बुधवारी खराब हवामानाचा फटका बसला. गारपीट आणि वादळातून बाहेर पडण्यासाठी या विमानाने पाकिस्तानच्या हवाई क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी परवानगी मागितली. या २२७ प्रवाशांचा जीव धोक्यात असतानाही पाकिस्तानने ही परवानगी नाकारली.

इंडिगो कंपनीच्या दिल्ली- श्रीनगर विमानाला बुधवारी पठाणकोटजवळ प्रतिकूल हवामानाचा सामना करावा लागला. तीव्र गारपीट आणि वादळामुळे या विमानाच्या प्रवासात अडथळे येत होते. अशा स्थितीत विमानाचे पुढचे टोकही (नोज) तुटले. विमानातील कर्मचाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार खराब हवामानामुळे भारतीय हवाई दलाच्या नॉर्दर्न कंट्रोलला आंतरराष्ट्रीय सीमेवर डावीकडे वळण्याची विनंती केली. मात्र ती मंजूर करण्यात आली नाही. त्यानंतर वैमानिकाने लाहोर हवाई वाहतूक नियंत्रणाकडे ही परिस्थिती टाळण्यासाठी पाकिस्तानच्या हवाई हद्दीचा वापर करण्याची परवानगी मागितली. मात्र त्यांना परवानगी देण्यात आली नाही.

पाकिस्तानने परवानगी नाकारल्याने वैमानिकांनी प्रतिकूल परिस्थितीत विमान श्रीनगरकडे नेण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे या विमानाला हवेतील तीव्र झटके आणि गारपिटीचा सामना करावा लागला.

वादळात नेव्हिगेट करताना विमानाने विविध तांत्रिक इशारे दिले. विमानाच्या वेगामध्येही फरक पडला. या कालावधीत विमानाचा उतरण्याचा दर प्रति मिनिट ८५०० पर्यंत पोहोचला. अखेर या विमानाने श्रीनगर विमानतळावर सुरक्षित अवतरण केले. विमानातील कोणत्याही प्रवाशाला दुखापत झाली नसल्याचे विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) सांगितले. या संपूर्ण प्रकरणाची 'डीजीसीए'कडून चौकशी करण्यात येत आहे.



### भारत-पाकिस्तानने हवाईक्षेत्र बंदी कालावधी वाढविला

नवी दिल्ली/ लाहोर : भारत आणि पाकिस्तानने आपापले हवाई क्षेत्र न वापरण्याच्या कालावधीत वाढ केली आहे. पाकिस्तानी विमान कंपन्यांसाठी भारताने आपले हवाई क्षेत्र बंद करण्याचा कालावधी २३ जूनपर्यंत वाढविला आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानविरोधात करण्यात आलेल्या कारवाईचा एक भाग म्हणून भारताने ३० एप्रिल रोजी लागू केलेली बंदी २३ मे रोजी संपणार होती. दुसरीकडे, पाकिस्तान विमानतळ प्राधिकरणाने भारतीय विमानांसाठी त्यांचे हवाई क्षेत्र न वापरण्याची मुदत २४ जूनपर्यंत वाढवली आहे. प्राधिकरणाने निवेदन जारी केले.

# पाकिस्तानपुरस्कृत दहशतवाद उघड

## गृहमंत्री अमित शहा यांचे स्पष्टीकरण; सशस्त्र दलांचे कौतुक

**पीटीआय, नवी दिल्ली**

**पहलगाम येथील** दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारताने पाकिस्तानात 'ऑपरेशन सिंदूर' राबवले. या कारवाईने भारतातील दहशतवाद पूर्णपणे पाकिस्तानपुरस्कृत असल्याचे उघड झाले, असे गृहमंत्री अमित शहा यांनी स्पष्ट केले आहे. 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान सीमा सुरक्षा दलाने (बीएसएफ) आपले कर्तृत्व सिद्ध करत पाकिस्तानचे हल्ले परतवून लावल्याचे कौतुकोद्‌गारही शहा यांनी काढले.

'बीएसएफ'च्या २२ व्या पदग्रहण समारंभानिमित्ताने 'रुस्तमजी स्मृती' व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या वेळी शहा बोलत होते. भारतीय सशस्त्र दलांनी प्रथम पाकिस्तानमधील दहशतवादी तळांवर हल्ला केला. त्यावर पाकिस्तानने प्रत्युत्तराचे केलेले प्रयत्न अयशस्वी ठरले. 'ऑपरेशन सिंदूर'ने भारतातील दहशतवाद पूर्णपणे पाकिस्तानपुरस्कृत असल्याचे उघड झाल्याचे शहा यांनी स्पष्ट केले.

''आम्ही ऑपरेशन सिंदूर राबवून पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. यामध्ये आम्ही पाकिस्तानी लष्कराच्या आस्थापनांना, नागरिकांना किंवा हवाई तळांना लक्ष्य केले नाही. आम्ही दहशतवाद्यांना लक्ष्य केले. परंतु पाकिस्तानने ते स्वतःवर घेतले,'' असे शहा म्हणाले.

''त्यांनी भारतीय नागरिकांना लक्ष्य करण्याचे धाडस केले. परंतु आमच्या हवाई संरक्षण यंत्रणेसमोर ते यशस्वी होऊ शकले नाहीत. त्याला प्रत्युत्तर म्हणून आम्ही त्यांच्या हवाई तळांना लक्ष्य करत त्यांना आमची वेधक क्षमता सादर केली,'' असे शहा यांनी सांगितले. ''यापूर्वी उरी, पुलवामा येथे दहशतवादी हल्ले झाले. त्यांना सर्जिकल स्ट्राइक, एअर स्ट्राइकने उत्तर दिले. आता पहलगाम येथील हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून 'ऑपरेशन सिंदूर' राबवले, असेही शहा म्हणाले.



### 'बीएसएफ'चे योगदान विसरू नका

देशाच्या सुरक्षेत 'बीएसएफ'ने दिलेल्या योगदानाचे कौतुक करताना शहा म्हणाले की, देशभक्तीच्या आधारावर सर्व अडचणींवर मात करून जगातील सर्वोत्तम दल कसे बनता येते, याचे 'बीएसएफ' एक उत्तम उदाहरण आहे. बांगलादेशसह आंतरराष्ट्रीय सीमांचे रक्षण करण्यात 'बीएसएफ' महत्त्वाची भूमिका बजावत आहे. शेजारी देशांनी 'बीएसएफ'ने त्याच्या निर्मितीत दिलेले योगदान विसरू नये, असेही शहा म्हणाले.

### बांगलादेशमध्ये युनूस राजीनामा देण्याच्या तयारीत?

**ढाका :** बांगलादेशमध्ये बदल घडविण्यासाठी राजकीय पक्षांत एकमत होत नसल्याने हंगामी सरकारचे प्रमुख महंमद युनूस राजीनामा देण्याच्या विचारात असल्याचे वृत्त माध्यमांत प्रसिद्ध झाले आहे. विद्यार्थिनेतृत्व असलेल्या 'नॅशनल सिटीझन पार्टी'चे प्रमुख हीद इस्लाम यांच्या वक्तव्याच्या आधारावर 'बीबीसी बांगला सर्व्हिस'ने हे वृत्त दिले आहेत. बांगलादेशमधील बदलती राजकीय स्थिती पाहता युनूस त्यांचे काम पुढे सुरू ठेवू शकतील का, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. संसदीय निवडणुका कधी घ्यायच्या, याबाबत लष्कर आणि हंगामी सरकारमध्येही मतभेद असल्याचे वृत्त आहे. युनूस हे मुख्य सल्लागार पदावरून निवृत्ती स्वीकारण्याचा विचार करीत असल्याचे म्हटले असले, तरी युनूस यांच्या कार्यालयाकडून अद्याप तसे कुठले वृत्त आलेले नाही. इस्लामने म्हटले आहे, 'सरांनी (महंमद युनूस) सांगितले, की मी या पदावर सामूहिक आंदोलनानंतर आलो. बांगलादेशमध्ये बदल आणि सुधारणा करण्याचे काम माझ्याकडे होते. पण, आताच्या स्थितीत चळवळींचा वाढता दबाव पाहता असे काम मी करू शकणार नाही. तुम्ही सर्व राजकीय पक्ष यावर एकमत बनविण्यात अपयशी ठरला आहात.'

### जर्मनीतील हॅम्बुर्ग रेल्वे स्थानकावर चाकूहल्ला

**बर्लिन :** जर्मन शहरातील हॅम्बुर्गमधील मध्यवर्ती रेल्वे स्थानकावर शुक्रवारी एका व्यक्तीने केलेल्या चाकूहल्ल्यात अनेक जण जखमी झाले. पोलिसांनी ही माहिती दिली. दरम्यान, या हल्लाप्रकरणात एका संशयिताला अटक करण्यात आली आहे. तथापि, पोलिसांनी जखमींची संख्या किंवा संशयिताची ओळख याबद्दल त्वरित कोणतीही माहिती दिली नाही. जर्मनीतील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे शहर हॅम्बुर्गच्या मध्यवर्ती भागात स्थित हे स्थानक स्थानिक, प्रादेशिक आणि लांब पल्ल्याच्या गाड्यांसाठी एक प्रमुख केंद्र आहे.

### इस्रायलच्या हल्ल्यात ६० ठार

**दीर अल-बलाह :** गाझामध्ये गेल्या २४ तासांत इस्रायलने केलेल्या हल्ल्यात हल्ल्यात किमान ६० जणांचा मृत्यू झाला. गाझाच्या आरोग्य मंत्रालयाने शुक्रवारी ही माहिती दिली. नासेर, अल-अक्सा आणि अल-अहली रुग्णालयांनुसार, दक्षिणेकडील खान युनूस शहरात झालेल्या हल्ल्यांमध्ये किमान १०, देईर अल-बलाहमध्ये चार आणि जबलिया निर्वासित छावणीत नऊ जणांचा मृत्यू झाला.

# 'आयपीएलच्या नावावर सट्टेबाजी, जुगार'

## सर्वोच्च न्यायालयाची केंद्राला नोटीस

**पीटीआय, नवी दिल्ली**



**'आयपीएलच्या** (इंडियन प्रीमियर लीग) नावावर लोकांकडून सट्टेबाजी व जुगार खेळला जात असल्याची बाब गंभीर आहे', अशी टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने एका जनहित याचिकेवर सुनावणी करताना केली. तसेच सट्टेबाजीशी संबंधित अ‍ॅपचे नियमन करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवरून सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्य कांत आणि एन. कोटिश्वर सिंह यांच्या खंडपीठाने सरकारला नोटीसही बजावली व उत्तर मागितले.

ऑनलाइन सट्टेबाजी आणि जुगाराच्या अ‍ॅपच्या वापरानंतर अनेक मुलांनी आत्महत्या केल्याचा दावा याचिकाकर्ते के. ए. पॉल यांनी केला आहे. सुनावणीवेळी खंडपीठाने महान्यायवादी आणि महान्यायअभिकर्ता यांचे सहकार्यही मागितले तसेच गरज भासल्यास सर्व राज्यांकडून उत्तरे मागितली जातील, असेही स्पष्ट केले.

> ही एक सामाजिक विकृती आहे. ज्याप्रमाणे आपण लोकांना खून करण्यापासून रोखू शकत नाही, त्याचप्रमाणे कोणताही कायदा लोकांना सट्टेबाजी किंवा जुगार खेळण्यापासून रोखू शकत नाही.
> – सर्वोच्च न्यायालय

जेव्हा लोक स्वेच्छेनेच सट्टेबाजीत सहभागी होत असतात तेव्हा काय करता येईल? असा प्रश्न उपस्थित करीत याचिकाकर्त्याच्या दाव्याशी सहमती व्यक्त करतानाच कायद्याद्वारे हा प्रकार रोखता येईल असा कदाचित गैरसमज असू शकतो, असे खंडपीठाने सुनावणी वेळी नमूद केले.

**महा मेट्रो**
**PUNE METRO**
**महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि.**
(भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांचा संयुक्त उपक्रम)
**पुणे मेट्रो रेल प्रकल्प (फेज २)**
ब्लॉक क्रमांक A3, जिल्हा न्यायालय पुणे, न्यायमूर्ती रानडे पथ, शिवाजी नगर, पुणे – ४११००५. दूरध्वनी: ०२०–२६०५१०७४
E-mail: tenders.pmrp@mahametro.org | www.punemetrorail.org

**निविदा सूचना क्रमांक : P2-DDC 03/2025 (NCB)** दि. २३/५/२०२५

**कामाचे स्वरूप:** पुणे मेट्रो रेल प्रकल्पाच्या खराडी – खडकवासला मार्गावरील स्थानकांच्या भागातील व्हायाडक्ट वगळता खराडी चौक – दांडेकर पूल या मार्गावरील १४ (चौदा) इलेव्हेटेड स्थानकांसाठी तपशीलवार डिझाइन सल्लागार सेवेकरिता.

ही निविदा सूचना (एनआयटी) पाहण्यासाठी, इच्छुक बोलीदार महा-मेट्रो वेबसाइट www.punemetrorail.com किंवा सीपीपी पोर्टल https://eprocure.gov.in ला भेट देऊ शकतात आणि निविदा कागदपत्रे डाउनलोड करू शकतात.

https://mahatenders.gov.in, ई-निविदा पोर्टलवरून निविदासंबंधित अधिक माहिती **२८/०५/२०२५ रोजी सायंकाळी ४ वाजल्यापासून ते १७/०६/२०२५ रोजी सायंकाळी ४ वाजेपर्यंत डाउनलोड करता येतील.**

**निविदा सूचना क्रमांक : P2-DPR- 02/2025 (NCB)** दि. २३/५/२०२५

**कामाचे स्वरूप:** पुणे विमानतळ (लोहेगाव) आणि कोंढवा/येवलेवाडी/उंड्री क्षेत्राला जोडणाऱ्या नवीन मेट्रो मार्गासाठी पर्यायी विश्लेषण अहवाल (AAR) आणि प्रकल्पाचा तपशीलवार अहवाल (DPR) तयार करणारी सल्लागार सेवा देण्याबाबत.

ही निविदा सूचना (एनआयटी) पाहण्यासाठी, इच्छुक बोलीदार महा-मेट्रो वेबसाइट www.punemetrorail.com किंवा सीपीपी पोर्टल https://eprocure.gov.in ला भेट देऊ शकतात आणि निविदा कागदपत्रे डाउनलोड करू शकतात.

https://mahatenders.gov.in, ई-निविदा पोर्टलवरून निविदासंबंधित अधिक माहिती **०३/०६/२०२५ रोजी सायंकाळी ४ वाजल्यापासून ते २४/०६/२०२५ रोजी सायंकाळी ४ वाजेपर्यंत डाउनलोड करता येतील.**

**कार्यकारी संचालक / खरेदी**
**महा-मेट्रो, PMRP**

Pune Metro : City's Transport Solution

**मुंबई शहर दिवाणी न्यायालयात दिंडोशी, गोरेगाव मुंबई येथील २०१४ चा व्यावसायिक खटला क्र. ५१८ (व्यावसायिक न्यायालय कायदा २०१५ अंतर्गत)**

**मेसर्स प्रमा हिकव्हीजन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड**
भारतीय कंपन्या अधिनियम, १९५६ अंतर्गत एक विधिसंस्थापित कंपनी आणि कंपन्या अधिनियम, २०१३ च्या अर्थबोधात अस्तित्वात असलेली, तिचे नोंदणीकृत कार्यालय येथे असलेले-सिद्धीविनायक आर्केड, दुसरा मजला, आकुर्ली क्रॉस रोड नं.१, स्टेशन कांदिवली (पूर्व) जवळ, मुंबई- ४००१०१, महाराष्ट्र
तिच्या अधिकृत प्रतिनिधीद्वारा, श्री. समित अजय मोदी
ईमेल आयडी – legal@pramahikvision.co
मोबाइल नं.- ८४५२०३६६८६ .............**वादी**
**विरुद्ध**
**मेसर्स रुद्रा इलेक्ट्रिक**
एक मालकी कंपनी तिच्या एकल मालकी कंपनीद्वारा श्री. लखन जटाशंकर यादव,
तिचे नोंदणीकृत कार्यालय येथे असलेले- शॉप/ ऑफिस नं. एफए/३४, पहिला मजला, लेक सिटी मॉल, ठाणे-भिवंडी रोड, ठाणे-४००६०७, महाराष्ट्र.
येथे सुद्धा- शॉप नं. २०३, दुसरा मजला, चावला कॉम्प्लेक्स, क्रोमाजवळ, सेक्टर- १५, बेलापूर-४००६१४, महाराष्ट्र
येथे सुद्धा- ३/३०५, देवी कृपा सोसायटी, गौरीशंकर वाडी, न्यू जैन मंदिराजवळ, पंतनगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई-४०००७५, महाराष्ट्र.
येथे सुद्धा- शॉप नं. ७, रिहॅब बिल्डिंग नं. ७, साईधाम सोसायटी, गौरीशंकर वाडी नं. २, पंतनगर, घाटकोपर (पू.), मुंबई-४०००७५, महाराष्ट्र.
मोबाइल नं.: ९७०२०६७७५६, ७५०००४१९०२
ईमेल- rudraelectronic7070@gamil.com
.............**प्रतिवादी**

सूचना घ्यावी की, हे माननीय न्यायालय **१६.०६.२०२५ रोजी** स. ११.०० वा. किंवा त्यानंतर त्वरित सी. आर. नं. ५ मधील अध्यक्षस्थानी न्यायाधीश एच. एच. जे. श्री. एस. एम. आगरकर यांच्यासमोर जाणार आहे, काऊंसेल/ॲडव्होकेट खालील अनुतोषाकरिता वादीच्या भागावर सुनावणी देवू शकतील. प्रतिवादीस प्रकरणाच्या विशिष्ट तथ्ये व परिस्थितीवर आधारित, संपूर्ण रकमेच्या प्रत्यक्ष वसूलीपर्यंत या खटल्याच्या अंमलबजावणीच्या नियत तारखेपासून वादींना प्रतिवादीद्वारे देय १२% प्र. व. दरातील पुढील व्याजासह आणि वाद दाखल झाल्याच्या तारखेपर्यंत त्यावरील देय व्याज आणि मुद्दल रकमेच्या अनुसार तात्काल तक्रारीशी जोडलेल्या दाव्याच्या तपशीलात नमूद केल्यानुसार **रु.१९,१२,५०७.१७/- (रुपये एकोणीस लाख बारा हजार पाचशे सात व पैसे सतरा फक्त)** रक्कम वादीस प्रदान करण्यास आदेश दिला जाईल व हुकुम दिला जाईल.
कोणतेही अन्य अनुतोष वादीस मंजूर करावयाची तथ्ये व परिस्थितीत योग्य व न्याय्य मानले जाऊ शकते.
आज दिनांकित १९ एप्रिल, २०२५

शिक्का

प्रबंधक करिता
शहर दिवाणी न्यायालय, दिंडोशी
**अतूल माटकर**
वादीकरिता ॲडव्होकेट
कार्यालय- १०१, ठाणे वास्तुशिल्प,
आवाज रेडिओ मंडप डेकोरेटर्सजवळ, एडुल्जी मार्ग,
चराई टेंबी नाका, ठाणे- ४००६०१.
मोबा. नं. ८२९१९२६००१
ईमेल आयडी- atul@awm-associates.com

**उल्हासनगर महानगरपालिका**
**आरोग्य विभाग**
**ई-निविदा सूचना सन २०२५-२०२६**

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर, जि. ठाणे क्षेत्रात घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अंतर्गत शहराच्या जुन्या साठलेल्या कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रिया करण्याकरिता अनुभवी निविदाकार यांच्याकडून दोन लिफाफा पद्धतीने जाहीर ई-निविदा https://mahatender.gov.in या वेबसाइटवरून मागवीत आहे.

| अ. क्र. | निविदेचा तपशील | कोरी निविदा पत्रकाची किंमत | निविदा अनामत रक्कम (EMD) | सुरक्षा अनामत रक्कम | निविदा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर येथील जुनी खडी मशीन, गायकवाड पाडा येथे डंपिंग ग्राऊंडवरील साठलेल्या कचऱ्यावर शास्त्रोकृत पद्धतीने बायोमायनिंग प्रक्रिया करण्यासाठी अभिकर्ता नेमणूक करणे. | २९५००/- (२५०००+१८% GST) | २७,००,०००/- | निविदा कार्यदेशाच्या किमतीवर ३% | २७ कोटी अंदाजित |

१) निविदा विक्री व स्वीकृती दि. २३.०५.२०२५ ते ०९.०६.२०२५ रोजी ०५.०० वाजेपर्यंत राहील.
२) निविदेचा पहिला लिफाफा शक्य झाल्यास दि. ०९.०६.२०२५ रोजी सायंकाळी ०५.१० वाजता ई-टेंडरिंग विभाग नागरी सुविधा केंद्र किंवा आयुक्त यांचे दालनात उघडण्यात येईल.
३) निविदापूर्व बैठक दिनांक २९.०५.२०२५ रोजी सकाळी १२.३० वाजता अतिरिक्त आयुक्त (शहर) उल्हासनगर महानगरपालिका यांच्या दालनात घेतली जाईल.

आलेल्या एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी राखून ठेवलेला आहे.

जा.क्र. उमपा/पीआरओ/१२५/२०२५
दिनांक : २३.०५.२०२५

सही/-
**सहा. सार्वजनिक आरोग्य अधिकारी**
उल्हासनगर महानगरपालिका

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**
(मालमत्ता व्यवस्थापन विभाग)
महापालिका प्रशासकीय भवन, शंकरराव चौक, कल्याण (पश्चिम) ४२१ ३०१

तारीखः २३ मे, २०२५

**जाहीर सूचना**

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील सर्व जाहिरात संरचना अभिकर्त्यांना याद्वारे सूचित करण्यात येत आहे की, येत्या काही दिवसांत **"चक्रीवादळाची संभावना असण्याची ॲलर्ट सूचना"** राज्य शासनाकडून प्राप्त झाली आहे. शासनाच्या सूचनेनुसार शहरामध्ये उभ्या असणाऱ्या होर्डींगबाबत चिंता व्यक्त करण्यात आली असून, त्यासाठी संबंधित सर्व यंत्रणांनी ॲलर्ट मोडवर राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.
महाराष्ट्र महानगरपालिका (आकाश-चिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियमन, २०२२ मधील नियम-८ फलकाची संरचनात्मक मजबुती पोट नियम (ख) फलक उभारणाऱ्या अभिकरणास अकल्पीत दुर्घटनेबाबत सर्व दायीत्वाची जबाबदारी संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याने योग्य ती शहानिशा करुन ठरवावी. अशा प्रकरणी संबंधित जाहिरात फलकाच्या मजबुतीबाबत प्रश्न उद्‌भवल्यास संबंधित अभिकरणाची जबाबदारी राहील अशी तरतुद आहे. तरतुदीच्या अनुषंगाने वादळी वाऱ्यांमुळे कोणतीही अनुचित घटना घडू नये, याची खबरदारी म्हणून महानगरपालिकेने सर्व जाहिरात संरचना अभिकर्त्यांस जाहिरात संरचनेचे नियमित देखभाल दुरुस्ती करुन स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्ट तात्काळ सादर करणेची नोटीस जा.क्र. कडोंमपा/इस्टेट/मुका/२०८, दिनांक २२ मे, २०२५ अन्वये समाज माध्यमांद्वारे पाठविण्यात आली आहे.
तरी सर्व जाहिरातदारांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील जाहिरात संरचनांचे मजबुतीबाबत शिघ्रगतीने स्ट्रक्चरल इंजिनियरसह पाहणी करून घ्यावी. पाहणीमध्ये जाहिरात संरचना कमकुवत असल्याचे निदर्शनास आल्यास ती तात्काळ काढून घेण्याची कारवाई करावी व पूर्तता अहवाल महापालिकेस सादर करावा. तसे न केल्यास येऊ घातलेले संभाव्य चक्रीवादळ व अन्य कोणत्याही कारणांमुळे जाहिरात संरचना पडून अनुचित घटना घडल्यास, त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सही/-
(रमेश मिसाळ)
उप आयुक्त, (मालमत्ता)
कल्याण डोंबिवली महानगरपालिका

जा.क्र.कडोंमपा/जसंवि/मुका/१४६
दिनांक- २३/०५/२०२५

**CFS Camlin Fine Sciences**

**कॅम्लिन फाईन सायन्सेस लिमिटेड**
CIN: L74100MH1993PLC075361
**नोंदणीकृत कार्यालय:** २ ते ५ मजला, ''ईन जी.एस. पॉईंट'' बिल्डींग, सी.एस.टी. रोड, कलिना, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई-४०० ०९८, भारत
फोन: ९१-२२-६७००१०००; **फॅक्स:** ९१-२२-२८३२४४०४; **ईमेल:** secretarial@camlinfs.com; **वेबसाइट:** www.camlinfs.com

**३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षाअखेरचे विधान लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष**

(रू. लाखांत)

| क्र. | तपशील | स्वतंत्र | | | | | संकलित | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संपलेले तीन महिने | | | संपलेले वर्ष | | संपलेले तीन महिने | | | संपलेले वर्ष | |
| | | ३१.०३.२०२५ (लेखापरिक्षित) | ३१.१२.२०२४ (अलेखापरिक्षित) | ३१.०३.२०२४ (लेखापरिक्षित) | ३१.०३.२०२५ (लेखापरिक्षित) | ३१.०३.२०२४ (लेखापरिक्षित) | ३१.०३.२०२५ (लेखापरिक्षित) | ३१.१२.२०२४ (अलेखापरिक्षित) | ३१.०३.२०२४ (लेखापरिक्षित) | ३१.०३.२०२५ (लेखापरिक्षित) | ३१.०३.२०२४ (लेखापरिक्षित) |
| १ | कारभाराद्वारे एकूण उत्पन्न (निव्वळ) | २७,२५९.६३ | २०,५०७.१० | २२,०३२.९७ | ८८,६४९.१३ | ७७,३२६.२१ | ४३,७४६.२८ | ४३,१०२.३६ | ३७,६६५.३७ | १,६६,६५२.६६ | १,४५,३९१.२२ |
| २ | चालू कामकाजातून कालावधीसाठीचा निव्वळ नफा/(तोटा) (कर व अपवादात्मक बाबींपूर्वी) | १,१६३.२३ | (७१९.४७) | (४,६७५.३६) | (२,७४२.८४) | (५,७७०.४०) | ३,६२८.९८ | ८६९.६५ | ७७४.२४ | ५,९२८.६२ | ५,८५९.२१ |
| ३ | चालू कामकाजातून कालावधीसाठीचा निव्वळ नफा/(तोटा) करपूर्व (अपवादात्मक बाबींनंतर) | १,१८९.६८ | (७१९.४७) | (४,८६८.२०) | (१२,३४३.०५) | (५,९६३.२४) | ३,०६९.५८ | ८६९.६५ | ७७४.२४ | ४,९४७.१० | ५,८५९.२१ |
| ४ | एकूण कालावधीसाठीचा निव्वळ नफा/(तोटा) करपश्चात (अपवादात्मक बाबींनंतर) | १,५६१.८४ | (५६२.७२) | (४,४०७.३०) | (७,६३१.०५) | (५,१३८.९२) | ११.०० | (७४७.१६) | (८,१७८.५१) | (१५,८११.९४) | (१०,४८७.५१) |
| ५ | कालावधीसाठीचा निव्वळ नफा/(तोटा) करपश्चात आणि अनियंत्रित स्वारस्ये (अपवादात्मक बाबींनंतर) | | | | | | (७२.४०) | (४१३.६४) | (७,७१३.९४) | (१३,९०४.५९) | (९,२७५.३४) |
| ६ | कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न | १,७५६.१५ | (७९४.८४) | (४,४२९.७९) | (७,६८५.०८) | (५,१४३.३८) | ५९०.४७ | (१,९५७.८०) | (८,२७०.८१) | (१७,०३५.४३) | (८,६९१.१०) |
| ७ | समभाग भांडवल | १,८७९.२१ | १,६७४.९५ | १,६७४.६५ | १,८७९.२१ | १,६७४.६५ | १,८७९.२१ | १,६७४.९५ | १,६७४.६५ | १,८७९.२१ | १,६७४.६५ |
| ८ | इतर समभाग | | | | ८४,३४७.७१ | ६९,८९६.७५ | | | | ८८,२८८.०९ | ८४,८००.४३ |
| ९ | प्रतिभागावर मिळकत (दर्शनी मूल्य १/- प्रत्येकी) (वार्षिकीकृत न केलेली) | | | | | | | | | | |
| | – मूलभूत ₹ | ०.८६ | (०.३३) | (२.५९) | (४.४१) | (३.०४) | (०.०४) | (०.२४) | (४.५३) | (८.०३) | (५.४९) |
| | – सौमीकृत ₹ | ०.८५ | (०.३३) | (२.५६) | (४.३६) | (३.००) | (०.०४) | (०.२४) | (४.४८) | (७.९५) | (५.४९) |

वरील संक्षिप्त माहिती ही ३१ मार्च, २०२५ रोजीची विस्तृत लेखापरीक्षित तिमाही आणि वर्षअखेरचे वित्तीय निष्कर्षाचा सारांश आहे आणि सदर निष्कर्ष हे सेबी (सूचीकरण आबंधने आणि प्रकटीकरण आवश्यकता) अनुशंगाने, २०१५ च्या नियमन ३३ अंतर्गत स्टॉक इक्स्चेंजेसकडे दाखल करण्यात आलेले आहेत. ३१ मार्च, २०२५ रोजीची विस्तृत लेखापरीक्षित तिमाही आणि वर्षअखेरचे परिणाम कंपनीच्या वेबसाइटवर www.camlinfs.com आणि स्टॉक एक्सचेंज वेबसाइट www.bseindia.com आणि www.nseindia.com वर उपलब्ध आहे.

कॅम्लिन फाईन सायन्सेस लिमिटेड
आशिष एस. दांडेकर
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डिआयएन: ०१०७७३७९

स्थळ : मुंबई
दिनांक: मे २३, २०२५